महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र. ०२२ २७५६०१४५
इ-मेल - cadreexam२०२३@gmail.com
Website: https://mahadma.maharashtra.gov.in

७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी. बेलापूर,
रेल्वे स्टेशन जवळ (पु) नवी मुंबई-४००६१४.

नपप्रसं/कक्ष-३ /संवर्ग पदभरती/अंतिम निवडसूची मुदतवाढ/२०२५/9853 दि. 30 DEC 2025

## -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय :- महाराष्ट्र नगरपरिषद गट-क परीक्षा २०२३ अंतर्गत लावण्यात आलेल्या निवडसूचीस मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :-
१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/ का.१३-अ दि. ०४ मे, २०२२.
२. अवर सचिव, नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. एमसीओ-२०२२/प्र.क्र.१३१/नवि-१४ दि. २२ ऑगस्ट, २०२२.
३. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाची जाहिरात क्र. नपप्रसं/कक्ष-३ ब/संवर्ग पदभरती/प्र.क्र.०१/२०२३/३८३४ दि. ११ जुलै, २०२३.
४. संचालनालयाचे प्रसिध्दीपत्रक क्र.नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/अंतिम निवडसूची/२०२४/५०६७ दि. २६ ऑगस्ट,२०२४.
५. संचालनालयाचे प्रसिध्दीपत्रक क्र.नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/अंतिम निवडसूची/२०२४/५२२१ दि. ३० ऑगस्ट,२०२४.
६. संचालनालयाचे प्रसिध्दीपत्रक क्र.नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/अंतिम निवडसूची/२०२४/५५१८ दि. १० सप्टेंबर,२०२४.
७. संचालनालयाचे प्रसिध्दीपत्रक क्र.नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/अंतिम निवडसूची/२०२४/५७१९ दि. १९ सप्टेंबर,२०२४.
८. संचालनालयाचे प्रसिध्दीपत्रक क्र.नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/अंतिम निवडसूची/२०२४/५८२९ दि. २४ सप्टेंबर,२०२४.
९. संचालनालयाचे प्रसिध्दीपत्रक क्र.नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/अंतिम निवडसूची/२०२४/६१७५ दि. ०६ ऑक्टोबर,२०२४.
१०.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि.०२ डिसेंबर, २०२५.

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ करीता दि. ११ जुलै, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून प्राप्त अर्जानुसार उमेदवारांची राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि. २५ ऑक्टोबर, २०२३ ते २४ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षेत उमेदवारांना संवर्गनिहाय प्राप्त झालेले गुण नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या

https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. १५ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते.

२. दि. ११ जुलै, २०२३ रोजीच्या जाहिरातीत संवर्गनिहाय व श्रेणीनिहाय नमूद रिक्त पदांच्या संख्येनुसार सदर परीक्षेतील पात्र उमेदवारांची गुणानुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून एकूण ८ संवर्गांची भाग-१ प्रारुप निवडसूची व भाग-२ अतिरिक्त प्रारुप निवडसूची (प्रतिक्षायादी) दि. १० जून, २०२४ रोजी संचालनालयाच्या https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

३. दि.१० जून, २०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप निवडसूचीतील भाग-१ व भाग-२ मधील कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र व गैरहजर उमेदवारांची नावे कमी करुन जाहिरातीत नमूद रिक्त पदसंख्येनुसार पात्र उमेदवारांची सामाजिक व समांतर आरक्षण तसेच गुणानुक्रमानुसार श्रेणीनिहाय अंतिम निवडसूचीत व अतिरिक्त अंतिम निवडसूचीत (प्रतिक्षायादी) आवश्यकतेनुसार श्रेणीबदल करुन संदर्भ क्र.४ ते ९ नुसार खालील तक्त्यात नमूद संवर्गांची शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.०४ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.११ निवडसूचीची कालमर्यादा यातील तरतूदीनुसार एक वर्षाच्या कालावधीसाठीभाग-१ अंतिम निवडसूची व भाग-२ अतिरिक्त अंतिम निवडसूची (प्रतिक्षायादी) याद्वारे प्रसिध्द करण्यात आली होती.

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | निवडसूची प्रसिध्द केल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत) | २६ ऑगस्ट, २०२४ |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक) | २६ ऑगस्ट, २०२४ |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद पाणीपुरवठा, मलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | २६ ऑगस्ट, २०२४ |
| ४ | महाराष्ट्र नगरपरिषद अग्निशमन अधिकारी | २६ ऑगस्ट, २०२४ |
| ५ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल व लेखापरीक्षकसेवा | ३० ऑगस्ट, २०२४ |
| ६ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) | १० सप्टेंबर, २०२४ |
| ७ | महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी | १९ सप्टेंबर, २०२४ |
| ८ | महाराष्ट्र नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक सेवा | ०६ ऑक्टोबर, २०२४ |

सामान्य प्रशासन विभागाकडील दि.०२ डिसेंबर, २०२५ रोजी च्या शासन निर्णयानुसार दि.०४ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरण्याबाबतच्या एकत्रित मार्गदर्शक सूचनांमधील परि.क्र.११ "निवडसूचीची कालमर्यादा" अंतर्गत (अ) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

"निवड समितीने तयार केलेली निवडसूची २ वर्षासाठी किंवा नवीन सूची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल, त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य ठरेल. तसेच ही मुदतवाढ निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत, त्या पदांपुरतीच असेल."

त्यानुसार या संचालनालयाने महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ अंतर्गत संदर्भ क्र. ४ ते ९ नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या भाग-१ अंतिम निवडसूची व भाग-२ अतिरिक्त अंतिम निवडसूचींची कालमर्यादा दि. ०२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार निवडसूची २ वर्षासाठी किंवा नवीन सूची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल, त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील.

तसेच संदर्भ क्र. ४ ते ९ नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रसिध्दीपत्रकालीत इतर अटी व शर्ती जशाच्या तशा लागू राहतील.

(अभिषेक कृष्णा)
आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय